Shri Tuljabhavani Bahuuddeshiya Samajsevi Sanstha, Vetalwadi's

# College of Education For Women, Kurduwadi

Tq. Madha, Dist. Solapur 413208

# Criteria No. 1
# Curricular Aspect

## 1.3 Curriculum Enrichment

### 1.3.1: Curriculum of the Institutions provides opportunities for the students to acquire and demonstrate knowledge, skills, values and attitudes related to various learning areas

## Documentary evidence in support of the claim

# कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वुमन कुर्डुवाडी मध्ये महिला दिन उत्साहात साजरा



**कुर्डुवाडी / शहर प्रतिनिधी**

कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वुमन, कुर्डुवाडी व अध्यापक विद्यालय कुर्डुवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.८ मार्च रोजी जागतिक महिला दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात श्री तुळजाभवानी व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संस्थापक डॉ. म.पं. सुरवसे हे होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वेताळवाडीच्या सरपंच डॉ. रजनी सुरवसे, म्हैसगावच्या सरपंच सीमा खारे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनंदा रणदिवे, पोलीस कॉन्स्टेबल दुर्गा चौगुले, मेघा आगवणे, आदर्श शिक्षिका सिमिंता कुंभार, आशा वर्कर विद्या राऊत, अंगणवाडी सेविका सीमा चौधरी, कांचन काळे अशा वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिला उपस्थित होत्या. या सर्व महिलांनी कोरोनाच्या काळात असामान्य व उल्लेखनीय असे कार्य केले म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी महाविद्यालयामार्फत महिला दिनाचे औचित्य साधून सत्कार व सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य रवि सुरवसे, प्रा. सुलभा लटके, प्रा. शितल तळेकर, प्रा.सुदर्शना दुधे, प्रा. राजश्री काळे, प्रा. रेश्मा भोंग, साधना सुरवसे, प्रा.सुधाकर अवचर, बाळासाहेब राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एल. एड द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी सायली देवकर व आभार प्रियंका गवळी यांनी केले.

पुण्यनगरी पु. पान. नं. 3 10/03/2021

# श्री तुळजाभवानी संस्थेच्यावतीने कर्तृत्ववान महिलांचा सन्मान



**कुर्डुवाडी/ शहर प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ कुर्डुवाडी व श्री तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वेताळवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने २० ऑक्टोबर रोजी शारदोत्सवानिमित्त कुर्डुवाडी व परिसरातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान डॉ. म.प. सुरवसे संकुलात झाला.

या कार्यक्रमाची सुरुवात तुळजाभवानी व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थापिका डॉ. रजनी सुरवसे या होत्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदारपदी निवड झालेल्या कुर्डूच्या सोनाली मनोहर भाजीभाकरे या उपस्थित होत्या. तसेच लता मोरे, वैशाली शहा, डॉ. मेघा शहा, नीना साळुंके, प्रिया मेहता, रतनबाई राऊत, दीपाली भागवत अशा वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिला उपस्थित होत्या. या सर्व महिलांनी आपल्या उद्योग - व्यावसायिक क्षेत्रामध्ये अतिशय उल्लेखनीय अशी प्रगती व विकास साधला आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ कुर्डुवाडी व श्री तुळजाभवानी बहुउद्देशीय संस्थेमार्फत शारदोत्सवाचे औचित्य साधून सत्कार व सन्मान करण्यात आला. या सर्व महिलांना 'यशस्वी व्यावसायिक महिला पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास रोटरी क्लब कुर्डुवाडीचे अध्यक्ष व बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य रवि सुरवसे, सचिव डॉ. सचिन गोडसे, डॉ. रवींद्र बोबडे, डॉ. हर्षद शहा, कॅप्टन अजिनाथ बोबडे, माजी नगराध्यक्ष जगन्नाथ क्षीरसागर, महेंद्र मेहता आदी उपस्थित होते. यावेळी प्रा. सुलभा लटके, प्रा. शीतल सुरवसे, प्रा. सुदर्शना दुधे, प्रा. राजश्री काळे, प्रा. रेश्मा भोंग, साधना सुरवसे, बाळासाहेब राऊत, अजय देशमुख, साई पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अतुल नेहरे, विजय टोणपे व शाळेचा स्टाफ तसेच डी.एड. चे विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुदर्शना दुधे व प्रा. सुलभा लटके यांनी केले. प्राचार्य रवि सुरवसे यांनी आभार मानले.

पुण्यनगरी पान नं. 23/10/2021

# डॉ. सुरवसे, प्राचार्य सुरवसे यांना शिक्षणरत्न पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २६ नोव्हेंबर-**
शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्यावतीने दिला जाणारा महात्मा फुले राज्यस्तरीय शिक्षण रत्न पुरस्कार तुळजाभवानी बहुउद्देशीय संस्था वेताळवाडीचे संस्थापक अध्यक्ष डॉ.मगन सुरवसे व त्यांचे चिरंजीव प्राचार्य रवी सुरवसे यांना देण्यात आला.

या पुरस्कार संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ.स्मिता म्हेत्रे व प्रसिद्ध सिनेअभिनेत्री दिपाली भोसले सय्यद या होत्या.



अ.भा.मराठी साहित्य परिषदेतर्फे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. वेताळवाडीचे रहिवासी डॉ.मगन सुरवसे,त्यांचे चिरंजीव प्राचार्य रवी सुरवसे यांनी शैक्षणिक क्षेत्रात योगदानाबद्दल म.फुले राज्यस्तरीय शिक्षण रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.परिषदेचे अध्यक्ष शरद गोरे, स्वागताध्यक्ष पंडितराव लोहोकरे, प्रदेशाध्यक्ष कवी फुलचंद नागटिळक, राज्यभरातील साहित्यिक रसिक, संस्थांचे पदाधिकारी, कर्मचारी,व सोलापूर येथील मान्यवर उपस्थित होते.या यशाबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.

पुण्यनगरी 26 नोवेंबर 2021

# गुणवंत विद्यार्थी व शिक्षक घडविणारी डॉ सुरवसे सरांची
# श्री तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था



**डॉ. मगन सुरवसे**
**(संस्थापक)**

'असाध्य ते साध्य करितासायास
कारण अभ्यास तुका म्हणे'

या वचनाप्रमाणे झटणारे, अहोरात्र कष्ट करणारे, अशक्य, कंटाळा हे शब्द त्यांच्या शब्दकोषात नसणारे असे व्यक्तीमत्व म्हणजे डॉ. मगन पंढरीनाथ सुरवसे सर. शैक्षणिक क्षेत्रात सेवा करताना माध्यमिक शिक्षक ते औरंगाबाद विद्यापीठाच्या एज्युकेशन विभागाचे डीन अशा उच्च पदांच्या जबाबदाऱ्या सांभाळत असताना समाजविकास साधण्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देणे गरजेचे आहे. या उदात्त हेतुने माढा तालुक्यात गुणवंत विद्यार्थी व शिक्षक घडविण्यासाठी श्री तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्था, वेताळवाडी या संस्थेची त्यांनी स्थापना केली.

''विवेक ज्ञानामृत मोक्षप्राप्तीचे साधन म्हणजे शिक्षण'' हे संस्थेचे ब्रीद वाक्य आहे. माढा तालुक्यात कुर्डुवाडी व माढा या ठिकाणी डीएड व बीएड ही शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालये आहेत. ज्ञानाची गंगा घरोघरी वहावी यासाठी माढा व कुर्डुवाडी येथे वायसीएमओयु नाशिक अंतर्गत बीए, एम. ए. ( मराठी व इंग्रजी), एम ए (एज्युकेशन) तसेच मुख्याध्यापकांसाठी आवश्यक असलेला डीएसएम अशा विविध अभ्यास केंद्रांची स्थापना केली. कुर्डुवाडी व माढा येथे सीबीएसई पॅटर्ननुसार साई पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमांच्या शाळा तर कुर्डुवाडी येथे सेमी इंग्रजी माध्यमाचे विवेकानंद विद्यामंदिर सुरु करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अध्ययन सुविधा उपलब्ध करुन दिल्या. अल्पावधीतच या महाविद्यलयांची लक्षणीय प्रगती झाली आहे. सामाजिक विकास हा शिक्षणातुन होतो, त्यामध्ये शिक्षकांची भूमिका महत्वाची आहे. त्यामुळे आदर्श शिक्षक व आदर्श विद्यार्थी घडविण्याचे काम सुरवसे संकुलात होते. आपल्या ज्ञानाचा उपयोग सर्वांना व्हावा, हा दृष्टिकोन ठेवत डॉ. सुरवसे सरांनी 'ग्रामीण शिक्षण आणि ग्रामीण विकास' तसेच 'सुक्ष्म अध्यापन कौशल्ये सज्जता प्रवर्तन', 'भूगोल आशययुक्त अध्यापन पद्धती' आदी पुस्तकांच्या लेखनाबरोबर संशोधनातदेखील मोलाची भर टाकली. याचा लाभ डीएड, बीएड, डीएसएम, एम. ए. (एज्युकेशन) प्रशिक्षणार्थ्यांना होत आहे. माढा, कुर्डुवाडी येथे संस्थेचा महाविद्यालयासाठी निसर्गरम्य वातावरणात भव्य इमारती उभारण्यात आल्या आहेत. या इमारती भौतिक सोयी-सुविधांनी सुसज्ज असून प्रदुषणरहित हवा राहण्यासाठी झाडे, बगीचा यासह शुद्ध पाणी या सुविधा आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत वेळेवर पोचण्यासाठी बस सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. दर्जेदार शिक्षक घडविण्याचे काम माढा तालुक्यापुरते मर्यादित न ठेवता उस्मानाबाद येथेही श्रीकृष्ण बहुउद्देशीय समाजसेवी संस्था स्थापन करुन बीएड कॉलेज, वायसीएमओयु नाशिकचे एम. ए.(एज्युकेशन) व डीएसएम हे अभ्यासकेंद्र सुरु केले. या सर्व संकुलात सध्या सुमारे २००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेच्या प्रगतीत संस्था अध्यक्षा डॉ. आर. व्ही. इंगळे, संस्थेचे जनरल सेक्रेटरी डॉ. रवी सुरवसे, डॉ. शीतल सुरवसे यांच्यासह संस्थेचे विविध पदाधिकारी यांचादेखील सिंहाचा वाटा आहे. इंग्लंड, स्वीत्झर्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली यासह ९ देशात जाऊन त्यांनी पर्यटनाबरोबरच शिक्षण संकुलांना भेट देत शिक्षणपद्धतीचा अभ्यास केला आहे. स्वतः अद्यायावत रहात शिक्षण क्षेत्रात वेगवेगळे उपक्रम राबवत आहेत. या कार्यामुळे त्यांना गतवर्षी अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेतर्फे महात्मा फुले राज्यस्तरीय 'शिक्षणरत्न' पुरस्कार मिळाला आहे. संस्थेतुन शिकून बाहेर पडलेले विद्यार्थी आज तहसीलदार, वनाधिकारी, पीएसआय, विविध संस्थांमध्ये मुख्याध्यापक, शिक्षक पदांवर यशस्वीपणे कार्यरत आहेत. माढा तालुक्यात नवनवीन शिक्षणक्रमांतुन तीन वर्षाच्या बालकापासून ५६ वर्षे वयाच्या मुख्याध्यपकांपर्यंत शिक्षण-प्रशिक्षण देणारी ही संस्था खरेच तालुक्यासाठी वरदान आहे.

**संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयात उपलब्ध असलेले सुमारे १० हजारापेक्षा अधिक संदर्भग्रंथांचा विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी व शिक्षकांना उपयोग होतो. संस्था, कॉलेजचे कॅंपस मोठे असून सुविधांयुक्त सुसज्ज इमारत आहे.**

**सीबीएसई पॅटर्ननुसार इंग्रजी माध्यमाचे साई पब्लिक स्कूल, सेमी इंग्रजी माध्यमाचे विवेकानंद विद्या मंदिरात डीएड, बीएड, डीएसएम, वायसीएमओ अंतर्गत बीए, एम. ए. (इंग्रजी, मराठी), एम. ए (एज्युकेशन) हे शिक्षण उपलब्ध आहे. संस्थेतील ८ प्राध्यापक नेट-सेट पात्रताधारक व ९ प्राध्यापक पीएच.डी. धारक असून त्यांचे प्रेरणास्थान डॉ. एम. पी. सुरवसे सर हे आहेत.**



**डॉ. रवी सुरवसे**
**(जनरल सेक्रेटरी)**



दैनिक दामाजी एक्सप्रेस

# तुळजाभवानी शिक्षण संकुल कुर्डूवाडी मध्ये स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न



कुर्डूवाडी (शहर प्रतिनिधी) : ...ई पब्लिक स्कूल, विवेकानंद ...्यामंदिर, डी एड व बी एड ...ॉलेज कुर्डूवाडी यांच्या संयुक्त ...िद्यमानाने दिनांक ४ मार्च रोजी ...ार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात ...ार पडले.या कार्यक्रमाची ...ुरुवात श्री. तुळजाभवानी ...तिमेच्या पूजनाने झाली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष ...ंस्थेचे संस्थापक डॉ. सुरवसे ...म.पी होते तर कार्यक्रमाचे उद्घाटन माढयाचे माजी आमदार विनायकराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार संजयमामा शिंदे उपस्थित होते. तसेच भोसरेच्या सरपंच स्वाती कुंभार,कुलकर्णी, डॉ जयंत करंदीकर उपस्थित होते. गणेश वंदनेने स्नेहसंमेलनाची सुरुवात झाली. स्नेहसंमेलनामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे नृत्य, मूकनाट्य, ...यनाट्य, लोककलेचे प्रकार छोट्याशा चिमुरड्यांनी सादर करून उपस्थितांचे व प्रेक्षकांची ...ने जिंकली. पाणी वाचवा, पाणी जिरवा, महिला सक्षमीकरण, मोबाईलचा दुरुपयोग असे संदेश वेगवेगळ्या नृत्यातून व लघु नाटिकेतून सादर करण्यात आले. डी.एडचे विद्यार्थी व विद्यार्थिनींनी देखील लावणी, वेगवेगळ्या गाण्यांवरती नृत्य सादर केले. लहान बालकलाकारांची अभिनय क्षमता व नृत्याविष्कार पाहून पालकांनी देखील टाळ्या वाजवून दाद दिली. कार्यक्रमाच्या पाहुण्या स्वाती कुंभार यांनी विद्यार्थ्यांच्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जावे अशा प्रकारचे प्रतिपादन केले. डॉ.जयंत करंदीकर व विनायक पाटील यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी रोटरीचे सचिव डॉ.सचिन गोडसे, इनरव्हीलच्या अध्यक्षा नीना साळुंखे, केंद्रप्रमुख कुंभार मॅडम, सुरेश बागल,डॉ. हर्षद शहा,डॉ. रजनी सुरवसे व बहुसंख्येने पालक उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे नियोजन समन्वयक डॉ.शितल तळेकर व प्राचार्य डॉ.रवी सुरवसे यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली साई पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अतुल नेहरे, विवेकानंद विद्यामंदिर चे मुख्याध्यापक विजय टोणपे, विद्या जाधव, सोनाली बागल, सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.सुलभा लटके व प्रा.सुदर्शना दुधे यांनी केले.

7 मार्च 2023 ' दामाजी एक्सप्रेस'



कुर्डुवाडी : तुळजाभवानी शिक्षण संकुलात स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी विनायक पाटील, डॉ. एम. पी. सुरवसे, डॉ. रवी सुरवसे, डॉ. सचिन गोडसे, डॉ. जयंत करंदीकर आदी.

# तुळजाभवानी शिक्षण संकुलात स्नेहसंमेलन उत्साहात

**▶सकाळ वृत्तसेवा**

कुर्डुवाडी, ता. ९ : येथील श्री तुळजाभवानी शिक्षण संकुलातील साई पब्लिक स्कूल, विवेकानंद विद्यामंदिर, डीएड व बीएड महाविद्यालयात आयोजित वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी सामाजिक संदेशपर नाटिका, नृत्य व कलाविष्कार सादर केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार विनायक पाटील व आमदार संजय शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक डॉ. एम. पी. सुरवसे होते. व्यासपीठावर भोसरे गावच्या सरपंच स्वाती कुंभार, गोविंदराव कुलकर्णी, डॉ. जयंत करंदीकर, डॉ. रजनी सुरवसे, प्राचार्य डॉ. रवी सुरवसे, डॉ. शीतल तळेकर, रोटरी क्लबचे सचिव डॉ. सचिन गोडसे, डॉ. हर्षद शहा, सुरेश बागल, नीना साळुंखे आदी उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध नृत्य, लोककला यासह 'पाणी वाचवा- पाणी जिरवा', 'महिला सक्षमीकरण', 'मोबाईलचा दुरुपयोग' अशा सामाजिक संदेशपर नाटिका सादर केल्या. डॉ. सुलभा लटके व प्रा. सुदर्शना दुधे यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक डॉ. शीतल तळेकर व प्राचार्य डॉ. रवी सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली साई पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अतुल नेहरे, विवेकानंद विद्यामंदिरचे मुख्याध्यापक विजय टोणपे, विद्या जाधव, सोनाली बागल, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

गुरुवार 10 मार्च 2023 'सकाळ' वृत्तपत्र

# ‘श्री तुळजाभवानी समाजसेवी’ भावी शिक्षक घडविणारी संस्था

२०१३ सालापासून याच संस्थेचे इंग्रजी माध्यमाचे साई पब्लिक स्कूल माढा परिसरात नावारुपास येत आहे. या ठिकाणी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिकचे बी. ए. व एम. ए. अभ्यास केंद्र सुरु असून ६०० पेक्षा जास्त विद्यार्थी दुरस्थ शिक्षण घेत आहेत. २००६ साली एसएनडीटी महिला विद्यपीठ मुंबईशी संलग्न असलेले कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वुमन्स हे कुर्डुवाडी येथे सुरु करण्यात आले.

कुर्डुवाडी व परिसरातील ग्रामीण भागात बीएडव डीएडची सुविधा उपलब्ध नसल्याने या परिसरातील विशेषतः मुलींची चांगली सोय झाली. त्याचबरोबर साई पब्लिक स्कूल ही इंग्रजी माध्यमाची शाळा व विवेकानंद विद्यामंदिर ही सेमी इंग्रजी माध्यमची



**कुर्डुवाडी (ता. माढा) : श्री तुळजाभवानी बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेच्या कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संस्थापक डॉ. म. प. सुरवसे व अन्य.**

शाळा २०१३ पासून ज्ञानदानाचे काम करत आहेत. या ठिकाणी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठचे बीएड तसेच मुख्याध्यापकांसाठी आवश्यक असलेले डीएसएम व एम ए (शिक्षणशास्त्र) हे दुरस्थ अभ्यासकेंद्र देखील सुरू आहे. शिक्षणशास्त्रातील बीएड व डीएड महाविद्यालय कुर्डुवाडी, माढा या सारख्या ग्रामीण भागात सुरु केल्याने येथील विद्यार्थी विशेषतः मुलींसाठी शिक्षक-शिक्षिका बनण्यासाठी चांगली संधी उपलब्ध करुन दिली.

सोलापूर जिल्ह्याबरोबरच संस्थेने जवळील धाराशिव येथेही डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादशी संलग्न कॉलेज ऑफ एज्युकेशन सुरु केले व गुणवत्तापूर्ण शिक्षक प्रशिक्षणाचे कार्य सुरू केले. संस्थापक डॉ. मगन पंढरीनाथ सुरवसे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबादचे माजी अधिष्ठाता असून शिक्षण क्षेत्रातील त्यांना चाळीस वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. या अनुभवाचा फायदा विद्यार्थ्यांना होत असून संस्था भविष्यात आणखी विविध उपक्रम राबवणार आहे. संस्थच्या बीएड., डीएड. महाविद्यालयात अकरा पीएच. डी. अर्हताधारक असून सेट, नेट उत्तीर्ण असलेले उत्तम दर्जाचे शिक्षक प्रशिक्षण देत आहेत.

यांच्या माध्यमातून प्रशिणार्थींना चांगल्या प्रकारे प्रशिक्षित करण्यासाठी शिबिरे, व्याख्याने, कार्यशाळा आयोजित केल्या जाणार आहेत. विद्यार्थ्यांना इंग्रजीसह विविध भाषांवर प्रभुत्व येण्यासाठी शिक्षक विशेष प्रयत्न करत असुन पुढेही करत राहणार आहेत. या कामी त्यांना डॉ. रजनी सुरवसे, डॉ. शितल सुरवसे, प्राचार्य डॉ. रवी सुरवसे, डॉ. शिवकुमार गणपुर, डॉ. तानाजी चंदनशिवे, सर्व मुख्याध्यापक, प्राध्यापक, शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी या सर्वांची मोलाची साथ लाभते असे संस्थापक डॉ. मगन सुरवसे यांनी सांगितले.

सध्या समाजाला मूल्य आधारित व तंत्रज्ञानाची जोड असलेल्या शिक्षकांची गरज आहे. ती गरज पू[र्ण] करण्यासाठी भावी शिक्षकांना उत्तमरीत्या घडवणे [व] त्यासाठी आवश्यक ते कार्य करण्याचा ध्यास संस्[थेने] घेतला आहे.

## लक्षवेधी

- संस्थेतील अनेक विद्यार्थी शिक्षण घेऊन शिक्षक, प्राचा[र्य] पदांवर कार्यरत.
- संस्थेचे काही विद्यार्थी प्रशासकीय पदांवर.
- वृक्षारोपण करुन संवर्धन करण्याचा वसा.
- रक्तदान शिबिराच्या आयोजनात शिक्षक, प्रशिक्षणार्थींचा सहभाग.
- कुर्डुवाडी, माढा या ग्रामीण भागात एकमेव शिक्षणशास्[त्र] महाविद्यालय.

## संस्थांच्या पुरस्कारांनी सन्मानि[त]

- तुळजाभवानी संस्थेच्या कार्याची दखल घेऊ[न] संस्थापक डॉ. म. प. सुरवसे यांना अखिल भारती[य] मराठी साहित्य परिषदेचा राज्यस्तरीय महात्मा फुले शिक्षणरत्न पुरस्कार, ‘सकाळ’ एक्सलन्स अवॉर्ड, रोटरी क्लब कुर्डुवाडी रोटरी सेवा पुरस्कार, रोटरी क्लब माढ्याचा शिक्षण क्षेत्राती[ल] दीपस्तंभ अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.

RNI NO.:MAHMAR/2022/82606

साप्ताहिक

# लोकबोध

MARATHI - WEEKLY
LOKBODH
KURDUWADI-SOLAPUR

#Email : lokbodhnews@gmail.com

संपादक : अनिल पंडित ढोबरे मोबा.: [illegible]

# कॉलेज ऑफ एज्युकेशन फोर वुमेन कुर्डूवाडी, येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी



कुर्डूवाडी/ प्रतिनिधी: साई पब्लिक स्कूल कुर्डूवाडी व विवेकानंद विद्यामंदिर कुर्डूवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन डॉ. म पं सुरवसे संकुलात उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाप्रसंगी सावित्री बाई यांच्या प्रतिमेला हार घालून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वूमेन चे प्राचार्य डॉ.आर.एम सुरवसे हे होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सौ.सीमा शेळके या उपस्थित होत्या . तसेच या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून श्री. हर्षल बागल हे उपस्थित होते.आजच्या कार्यक्रमाचे औचित्य साधून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये साई पब्लिक स्कूल व विवेकानंद विद्या मंदिर मधील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित नाटक सादर केले व सावित्रीबाई ज्योतिबा यांची वेशभूषा करून भाषणे केली तर डी. एल. एड प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष मधील विद्यार्थिनींनी बालिका दिनानिमित्त"बेटीया बेटिया "या गीता वर आधारित लघु नाटिका सादर केली. 'होय ,मी सावित्री बोलते' हे एकपात्री नाटक डी.एड..प्रथम वर्षातील विद्यार्थिनी तेजल उबाळे हिने सादर केले.तसेच सावित्रीबाई फुले यांच्यावर आधारित ओवी ,पोवाडा गीत गायन करण्यात आले. बी.एडच्या विद्यार्थिनींनी योगाचे महत्त्व पटवून देण्यासाठी योगा डान्स सादर केला .या कार्यक्रमास कॉलेज ऑफ एज्युकेशन फोर वुमेन कुर्डूवाडी व अध्यापक विद्यालय कुर्डूवाडी चे प्राचार्य डॉ. आर.एम सुरवसे ,साई पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक श्री .अतुल नेहरे, आदी उपस्थित होते . यावेळी डॉ.शीतल तळेकर, डॉ. सुलभा लटके, प्रा. सुदर्शना दुधे , प्रा.राजश्री काळे, प्रा. रेश्मा भोंग, प्रा.नागनाथ बागल, उपमुख्याध्यापक सोनाली बागल, उपमुख्याध्यापक विद्या जाधव, सर्व शिक्षक -शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी , बीएड विद्यार्थिनी, डीएड विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी.एड विद्यार्थिनी प्रियांका माने व वैष्णवी कुलकर्णी यांनी केले .प्रियंका पांडगले यांनी आभार मानले.

दैनिक
जनसत्य
नि:पक्ष नजर...,नि:पक्ष खबर...

# अध्यापक विद्यालयात सावित्रीबाई फुले दिन साजरा



**जनसत्य, प्रतिनिधी**

**कुर्डूवाडी :** कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वुमेन,अध्यापक विद्यालय कुर्डूवाडी, साई पब्लिक स्कूल कुर्डूवाडी व विवेकानंद विद्यामंदिर कुर्डूवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व बालिका दिन डॉ.म.पं.सुरवसे संकुलात उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रथमतः सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस हार घालून, मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेज ऑफ एज्युकेशन फॉर वूमेनचे प्राचार्य डॉ.आर.एम.सुरवसे हे होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून,ड. सीमा शेळके या उपस्थित होत्या. जयंती तसेच बालिका दिनाचे औचित्य साधून, विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये साई पब्लिक स्कूल, विवेकानंद विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित नाटक सादर केले व सावित्रीबाई तसेच ज्योतिबा फुले यांची वेशभूषा करून भाषणे केली.

डी.एल.एड प्रथम वर्ष व द्वितीय वर्ष मधील विद्यार्थिनींनी बालिका दिनानिमित्त बेटीया बेटिया या गीतावर आधारित लघु नाटिका सादर केली. होय_मी सावित्री बोलते, हे एकपात्री नाटक डी.एड. प्रथम वर्षातील विद्यार्थिनी तेजल उबाळे हिने सादर केले.


w-app 9850141355